# अहिल्यानगर जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

## अहिल्यानगर जिल्ह्यातील शिवसेना (उबाठा) पदाधिकारी जाहीर

अहिल्यानगर(समर्थ गांवकरी)

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने अहिल्यानगर जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत, अशी माहिती मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्ध झालेल्या पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे.

जाहीर झालेले पदाधिकारी पुढीलप्रमाणे –

– जिल्हाप्रमुख : राजेंद्र दळवी (नगर तालुका व नगर शहर, पारनेर विधानसभा, कर्जत–जामखेड विधानसभा, राहुरी विधानसभा – ४० गावे वगळून)

– सहसंपर्कप्रमुख : दादाभाऊ येणारे (पारनेर विधानसभा), चंद्रकांत चिकणे (राहुरी विधानसभा), संजय भांबुरे (शेवगाव विधानसभा)

– विधानसभाप्रमुख : अजिंक्य लव्हाट (शेवगाव विधानसभा)

– तालुकाप्रमुख : अविनाश मगरे (शेवगाव तालुका), विजय शेंडे (श्रीगोंदा तालुका), नितीन कोतकर (नगर तालुका)

– प्रभारी तालुकाप्रमुख : मयूर डोके (जामखेड तालुका)

– तालुका संघटक : किसन सुपेकर (पारनेर तालुका)

– तालुका समन्वयक : उदय गांगर्डे (शेवगाव तालुका)

– शहर समन्वयक : प्रवीण दुबे (शेवगाव शहर)

नितीन भाऊसाहेब कोतकर यांची नगर तालुकाप्रमुखपदी नियुक्ती

नगर : शिवसेनेचे कट्टर व निष्ठावंत समर्थक हिंदुधर्मरक्षक स्व. अनिल भैय्या राठोड यांचे कट्टर समर्थक स्व. भाऊसाहेब कोतकर यांचे चिरंजीव श्री. नितीन भाऊसाहेब कोतकर यांची शिवसेनेच्या नगर तालुकाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे पक्षप्रमुख मा. उद्धवसाहेब ठाकरे, युवा सेना प्रमुख मा. आदित्यसाहेब ठाकरे, शिवसेना नेते खा. संजय राऊत, संपर्कप्रमुख आमदार सुनील शिंदे, शिवसेनेचे मा. संपर्कप्रमुख भाऊ कोरगावकर तसेच जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे. स्व. भाऊसाहेब कोतकर यांनी शिवसेनेशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहत पक्षाची विचारधारा आणि संघटन मजबूत करण्यासाठी कार्य केले. त्यांच्या निष्ठेचा आणि कार्याचा वारसा पुढे घेऊन जाणारे नितीन कोतकर यांची नगर तालुकाप्रमुखपदी झालेली नियुक्ती ही कोतकर कुटुंबाच्या शिवसेनेशी असलेल्या जुन्या नात्याची पावती मानली जात आहे. नितीन कोतकर हे मा. जिल्हा नियोजन समिती सदस्य अविनाश कोतकर यांचे बंधू असून सामाजिक व विकासात्मक कार्यातही ते सक्रिय आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे नगर तालुक्यात शिवसेना संघटनेला अधिक बळकटी मिळणार असून तळागाळातील कार्यकर्त्यांना एकत्रित करून पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी ते प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



स्व. अनिल भैय्या राठोड आणि स्व. भाऊसाहेब कोतकर यांच्या विचारांचा व निष्ठेचा वारसा जपत शिवसेना संघटना मजबूत करण्यासाठी तसेच सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी प्रामाणिकपणे काम करणार, असा निर्धार नवनियुक्त नगर तालुकाप्रमुख नितीन भाऊसाहेब कोतकर यांनी व्यक्त केला.

नितीन कोतकर यांच्या नियुक्तीबद्दल शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# शासनाने तत्काळ दुष्काळ जाहीर करुन सरसकट नुकसान भरपाई द्यावी : शेतकरी नेते बाळासाहेब ढाकणे

पाथर्डी (समर्थ गांवकरी)

पाथर्डी तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पिके पावसाअभावी जळुन गेले आहेत. शेतकऱ्यांचे १००% पिकांची नुकसान झाले असुन शेतकऱ्यांना पावसाअभावी नुकसान झालेले पिके मोडण्याची पाळी आली आहे, त्यामुळे शेतकरी एक तर अगोदरच मशागत खर्च, बियाणे खर्च,पेरणीखर्च, खुरपणी खर्च,फवारणी खर्च याने मेटाकुटीस आला आहे तसेच १००% पिके पावसाअभावी जळुन गेल्यामुळे पिके मोडून शेतकरी पुन्हा शेतीची मशागत करू शकत नाही, कारण शेतकरी पाऊस नसल्यामुळे हवालदिल झाला आसुन शेतकरी कधी नव्हे एवढ्या मोठ्या संकटात सापडला आहे.तरी महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर करण्यासाठी मंत्रीमंडळाची तातडीने बैठक घेऊन दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तातडीने हेक्टरी ५० हजार पिक नुकसान भरपाई देऊन संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय व आधार द्यावा, अशी मागणी राष्ट्रीय शेतकरी युनीयनचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष शेतकरी नेते बाळासाहेब ढाकणे यांनी ईमेलद्वारे मुख्यमंत्री व कृषीमंत्री यांना केली आहे.

ढाकणे यांनी मागणीत म्हटले आहे की, शेतकयांच्या पिकांचे पावसाअभावी १००% नुकसान झाले असुन शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा मंजुर करावा तसेच ग्रामीन भागात पाण्याचा प्रश्न गंभीर असुन टॅंकरद्वारे पाणी पुरवठा सुरु करावा व जनावरांसाठी छावण्या सुरु करुन शेतकरी, शेतमजुर व मजुरांना रोजगार हमीचे कामे मंजूर करावेत व विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क व परीक्षा शुल्क माफ करून

दुष्काळग्रस्तांच्या सर्व उपयोजना लागु करुन तातडीने दुष्काळ जाहीर करून महाराष्ट्र



शासनाने संकरात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे तसेच महाराष्ट्र सरकारने आता शेतकऱ्यांचा अंत न पाहता तातडीने दुष्काळ जाहीर करून पिंक नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या बॅंक खात्यात वर्ग करावे तसेच संकाटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने शेतकरी नेते बाळासाहेब ढाकणे यांनी ईमेलद्वारे मुख्यमंत्री व कृषीमंत्र्याकडे केली आहे.

# धरणे आंदोलन रोखण्यासाठी पोलिसांचा फोन; मनिषा वाघमारे यांचा दबाव आणल्याचा आरोप!

## पोलीस कॉ गणेश मुंडे महीलेचा विनयभंग असल्याचा आरोप

आळंदी (समर्थ गांवकरी)

चाकण उत्तर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी पोलीस कॉन्स्टेबल गणेश साहेबराव मुंडे यांना अटक करण्याच्या मागणीसाठी सौ. मनिषा संजय वाघमारे यांनी दि. ११ सप्टेंबर रोजी पिंपरी–चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मात्र, आंदोलन करू नये यासाठी पोलिसांकडून दूरध्वनीवरून दबाव आणण्यात आल्याचा आरोप वाघमारे यांनी केला आहे.

वाघमारे यांच्या म्हणण्यानुसार, एसीपी सुधाकर यादव, चाकण पोलीस ठाणे तसेच तपासी अधिकारी एसीपी कार्यालयातील पाटोळे यांनी त्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून आंदोलन न करण्याचे सांगितले. या संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर प्रसारित झाल्याने प्रकरण चर्चेत आले आहे. आरोपी हा पोलिसांच्याच खात्यातील कर्मचारी असून, याच खात्यात कार्यरत असलेल्या महिलेचा विनयभंग झाल्यानंतरही पोलिसांकडून आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे का, असा संतप्त सवाल वाघमारे यांनी उपस्थित केला आहे. विशेष म्हणजे, संबंधित पोलीस कर्मचाऱ्याने आपल्याला जिवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकरणाची माहिती सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्याकडे दिल्याचे वाघमारे यांनी सांगितले असून, पोलिसांनी तातडीने आरोपीवर अटकेची कारवाई करून न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे. काही दिवसांपूर्वी सामाजिक कार्यकर्ते संतोष पंडित यांच्यावर एका महिलेने गुन्हा दाखल केल्यानंतर काही तासांतच अटक करण्यात आली; मग या प्रकरणात गुन्हा दाखल होऊन ४१ दिवस उलटूनही आरोपीवर कारवाई का होत नाही, असा सवाल त्यांनी केला आहे. न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आळंदी पोलिसांनी वाघमारे यांना प्रतिबंधात्मक नोटीस बजावली असून, दि. ११ सप्टेंबरच्या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मिरजगावात चोरट्यांनी एकाच रात्रीत दोन दुकाने फोडली

## मुख्य बाजार पेठेतील घटना ; व्यापारी वर्गामध्ये खळबळ

मिरजगाव (समर्थ गांवकरी)

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील मुख्य बाजार पेठेतील क्रांती चौक या भागात असलेले व्यापारी प्रसाद नंदकिशोर पंडित यांचे स्नेहा ज्वेलर्स आणि कल्याण कणसे यांचे साईमाया जनरल स्टोअर ही दोन दुकाने बुधवारी मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास सुमारे चार ते पाच अज्ञात चोरट्यांनी दुकानांचे शटर धारदार शास्त्राने वाकवून चोरी करण्याचा प्रयत्न केला. परंतु याच भागातील राहणाऱ्या नागरिकांच्या सतर्कतेमुळे या चोरट्यांचा चोरीचा प्रयत्न असफल झाला. घटनास्थळी फॉरेन्सिक सायन्स लॅबच्या तज्ञांनी पाहणी करून दुकानांच्या शटर वरील फिंगरप्रिंट् घेतले आहे.

याबाबत मिरजगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरटयांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील कायम रहदारी असलेल्या वर्दळीच्या ठिकाणी मुख्य बाजारपेठेतील दुकान फोडल्याने शहरातील व्यापारी वर्गामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मिरजगाव शहरातील कायम वर्दळीचे ठिकाण असलेल्या क्रांती चौकात स्नेहा ज्वेलर्स व साईमाया जनरल स्टोअर हे दुकाने असून मध्यरात्री दुचाकी वाहनावरून आलेल्या चार ते पाच अज्ञात चोरट्यांनी या दुकानाचे शटर तोडून चोरी करण्याच्या उद्देशाने आत घुसण्याचा प्रयत्न केला. असताना याच भागातील काही नागरिक रात्रीच्या वेळी कामानिमित्त जागी असताना त्यांना शटर धारदार शास्त्राने कोणीतरी व्यक्ती वाकवत असताना आवाज आला निदर्शनास आले. आणि त्यांनी तात्काळ ज्वेलर्स व्यापारी प्रसाद पंडित यांना फोन केला. तोच लगेच याबाबत पोलिसांना कळविण्यात आले. आणि क्षणातच पोलीस व व्यापारी, ग्रामस्थ आल्याने चोरट्याने त्या ठिकाणाहून पालायान केले.

यावेळी दुचाकीवरून आलेल्या या अज्ञात चोरट्यांचा काही अंतरापर्यंत पोलिस व ग्रामस्थांनी सिनेस्टाईल पाठलाग करण्यात आला. परंतु यात अज्ञात चोरट्यांनी दुचाकी वाहन रस्त्यावर सोडून अंधाराचा फायदा घेत पळून जाण्यात यशस्वी ठरले.



कर्जत शहरात नुकतेच एका रात्रीत तीन दुकाने फोडली असल्याची घटना घडली आहे. या तिन्ही ठिकाणी एकाच पद्धतीने चोऱ्या झाल्या. त्याच पद्धतीने मिरजगाव येथे देखील एकाच रात्री दोन दुकाने फोडण्यात आली आहे. दोन्ही शहरात सराफ दुकाने टार्गेट केल्याने शहरातील सराफ व्यापाऱ्यांमध्ये सध्या तरी घबरटीचे वातावरण दिसत आहे.

कर्जत शहर व मिरजगाव शहरात रात्रीचे चोरीचे सत्र वाढल्याने पोलीसांनी रात्रीचा गस्त वाढवावा.

सतत वाढत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे परिसरातील व्यापारी वर्गात असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

# लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेचा रौप्यमहोत्सवी टप्पा; ४३ कोटींच्या ठेवी, ५५ लाखांचा निव्वळ नफा!

## लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेची १३ सप्टेंबरला २५ वी वार्षिक सभा!

अकोले (समर्थ गांवकरी)

रुंभोडी ता. अकोले येथील लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षाची २५ वी वार्षिक अधिमंडळ सभा रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या सर्व सभासदांनी या वार्षिक सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थापक–चेअरमन श्री. प्रविण लक्ष्मण मालुंजकर तसेच संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या सभेत संस्थेच्या वर्षभरातील आर्थिक व प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेण्यात येणार असून आगामी आर्थिक वर्षाच्या नियोजनावरही चर्चा होणार आहे.

लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची स्थापना व नोंदणी १८ ऑक्टोबर २००१ रोजी झाली. संस्थेने २५ वर्षांची वाटचाल पूर्ण केली असून यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केले जात आहे. साधेपणा, आर्थिक शिस्त, काटकसर, कर्जवसुलीचे नियोजन तसेच सहकार कायदा, नियम व पोटनियमांचे पालन या माध्यमातून संस्थेने प्रगती साधल्याचे वार्षिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण अकोले तालुका असून रुंभोडी येथे मुख्य शाखा आणि अकोले येथे शाखा कार्यरत आहे. दोन्ही ठिकाणी संस्थेच्या स्वमालकीच्या इमारती असल्याचेही अहवालात नमूद आहे.

### २,७१८ सभासदांची संस्था:

दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे २,७१८ सभासद आहेत. संस्थेचे अधिकृत भागभांडवल २ कोटी रुपये असून वसूल भागभांडवल १ कोटी ४३ लाख ८४ हजार ८०० इतके आहे. मागील वर्षाच्या तुलनेत भागभांडवलात १४ लाख ७४ हजार ५०० इतकी वाढ झाली आहे. संस्थेकडे राखीव व इतर निधी ६ कोटी ३५ लाख २७ हजार २६० असून स्वनिधी ४ कोटी ९९ लाख ३५ हजार ३७१ इतका झाला आहे.

### ठेवींमध्ये मोठी वाढ:

संस्थेच्या आर्थिक प्रगतीमध्ये ठेवींचा महत्त्वाचा वाटा असून दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे ४३ कोटी ४ लाख ५५ हजार ५०० इतक्या ठेवी आहेत. अहवाल वर्षात ठेवींमध्ये तब्बल १० कोटी २६ लाख ५५ हजार ५०० इतकी वाढ झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. विविध प्रकारच्या बचत, अल्पमुदत, आवर्ती, मुदत व इतर ठेव योजनांच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक सेवा दिली जात आहे.

### ३२ कोटींचे कर्जवाटप:

दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडील एकूण येणे कर्ज ३२ कोटी १२ लाख ७१ हजार ८२ इतके आहे. मागील वर्षाच्या तुलनेत कर्जवाटपात ६ कोटी ७० लाख ११ हजार ८२ इतकी वाढ झाली आहे. संस्थेने कर्जवाटपाबरोबरच वसुलीचे योग्य नियोजन केल्याने संस्थेचा निव्वळ एनपीए शून्य टक्के राखण्यात यश आल्याचे वार्षिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. संस्थेचा सीडी रेशो ६७.६७ टक्के, सीआरआर १.०५ टक्के, एसएलआर ३१.१७ टक्के आणि सीआरएआर १४.८८ टक्के असल्याचे अहवालात नमूद आहे.

### ५५ लाख २८ हजारांचा निव्वळ नफा:

अहवाल वर्षात संस्थेला एकूण ४ कोटी ४९ लाख २१६ इतके उत्पन्न मिळाले. त्यातून ठेवींवरील व्याज २ कोटी ९२ लाख ७४ हजार ५६५, एकूण खर्च ३३ लाख ८२ हजार ५३०.७० आणि विविध तरतुदी ६७ लाख १४ हजार १४१ वजा जाता संस्थेला ५५ लाख २८ हजार ९७९.३० इतका निव्वळ नफा झाला आहे. नफा विभागणीमध्ये राखीव निधीस २५ टक्के, लाभांशासाठी ९ टक्के तसेच संशयित व बुडीत कर्ज निधीसाठी तरतूद करण्यात आली आहे.

### 'अ' वर्गाची परंपरा कायम:

संस्थेला सन २०२५–२०२६ या आर्थिक वर्षासाठीही लेखापरीक्षणात 'अ' वर्ग मिळाला असून स्थापनेपासून 'अ' वर्ग मिळविण्याची परंपरा संस्थेने कायम राखल्याचे अहवालात नमूद आहे. संस्थेने एमआयएस प्रणाली, एनपीए निकष, रोख व वैधानिक तरलता तसेच कर्जवसुलीचे नियोजन यावर भर दिल्याचे सांगण्यात आले आहे. संस्थेच्या संचालक मंडळाच्या वर्षभरात १२ सभा तर कर्ज वसुली समितीच्या चार सभा झाल्या असून विविध विषयांवर निर्णय घेण्यात आले.

### आधुनिक बँकिंग सुविधा:

सभासदांच्या सोयीसाठी संस्थेत ऑनलाइन कोअर बँकिंग प्रणाली कार्यरत आहे. मोबाईल बँकिंग, आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस आणि एसएमएस यांसारख्या सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. इतर बँकांमध्ये रक्कम हस्तांतरित करण्याची सुविधाही सभासदांना मिळत आहे. तसेच रुंभोडी शाखेत सभासदांसाठी अत्यल्प दरात लॉकर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वयस्कर व दिव्यांग सभासदांच्या सोयीसाठी मुख्य शाखेचे दैनंदिन कामकाज तळमजल्यावर सुरू असल्याचेही अहवालात नमूद आहे.

### १९ कोटी ५१ लाखांची गुंतवणूक:

संस्थेने अहवाल वर्षात १९ कोटी ५१ लाख ४१ हजार १५९ इतकी गुंतवणूक केली आहे. निधीच्या स्वतंत्र गुंतवणुका एडीसीसी बँकेत करण्यात आल्याचे अहवालात नमूद आहे. संस्थेच्या मुख्यालयाची रुंभोडी येथे तीन मजली इमारत असून अकोले शाखेचीही स्वमालकीची इमारत आहे. संस्थेची कायम मालमत्ता ६० लाख ४० हजार १६ इतकी असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### वार्षिक सभेत १४ विषयांवर चर्चा:

१३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या वार्षिक सभेत अध्यक्षांची निवड, मागील वार्षिक सभेचा वृत्तांत कायम करणे, आर्थिक वर्षाचा कामकाज अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रकास मंजुरी, नफा वाटणीस मान्यता, सन २०२६–२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी, लेखापरीक्षण अहवालावर विचार, बाहेरील कर्जाची मर्यादा निश्चित करणे, संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे, वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती, नवीन शाखा अथवा कार्यालयासाठी संचालक मंडळास अधिकार देणे, प्रशिक्षण–कर्ज–गुंतवणूक–वसुलीच्या वार्षिक धोरणांना मंजुरी, मागील लेखापरीक्षणातील दोष दुरुस्ती अहवालाची नोंद तसेच सभासद, संचालक व कर्मचारी प्रशिक्षण आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

लक्ष्मी ग्रामीण पतसंस्थेकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव: वार्षिक सभेत प्रशस्तिपत्र व रोख पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांचा होणार सन्मान!

लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था यांच्या वतीने सन २०२५–२०२६ या शैक्षणिक वर्षातील माध्यमिक शालांत परीक्षेत तालुक्यात तसेच परिसरातील विद्यालयांमध्ये प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा वार्षिक सभेत प्रशस्तिपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पतसंस्थेने हा उपक्रम राबविला आहे.

यामध्ये कु. संस्कृती बापुसाहेब शिंगाडे (अकोले) हिने मॉर्डन हायस्कूल, अकोले येथे ९९.४० टक्के गुण मिळवून अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. चि. सर्वेश बाळासाहेब साकुरे (रुंभोडी) याने प्रवरा विद्यालय, इंदोरी येथे ९५.६० टक्के, कु. श्रद्धा सुनिल बंगाळ (मेहेंदुरी) हिने श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, मेहेंदुरी येथे ९२.६० टक्के, तर कु. वैष्णवी संतु दातखिळे (टाकळी) हिने न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, रुंभोडी येथे ९०.६० टक्के गुण मिळवून आपल्या विद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

तसेच चि. पवन दगडू आढळ (पिंपळगाव नाकविंदा) याने महालक्ष्मी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव नाकविंदा येथे ८९.६० टक्के, कु. ईश्वरी नवनाथ मुंढे व कु. श्रुती अनिल पुंडे (ढोकरी) यांनी श्री संत ज्ञानेश्वर विद्यालय, ढोकरी येथे प्रत्येकी ८८.६० टक्के, कु. श्रावणी बाळासाहेब भोर (आंबड) हिने अंबिका माध्यमिक विद्यालय,




आंबड येथे ८६ टक्के, कु. प्राची कैलास अवचिते (निंब्रळ) हिने न्यू इंग्लिश स्कूल, निंब्रळ येथे ८४ टक्के, तर कु. वैष्णवी हरिदास आरोटे (चितळवेढे) हिने ह.भ.प. सावित्रीबाई विद्या मंदिर, विठे येथे ८१.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने त्यांचा वार्षिक सभेत विशेष सन्मान करण्यात येणार असून, प्रशस्तिपत्रासह रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीत सभासद, ठेवीदार, कर्जदार, संचालक मंडळ, कर्मचारी, सल्लागार, अधिकारी, लेखापरीक्षक, सहकारी संस्था विभाग, बँक अधिकारी तसेच हितचिंतकांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभल्याबद्दल संस्थापक–चेअरमन प्रविण लक्ष्मण मालुंजकर व संचालक मंडळाने कृतज्ञता व्यक्त केली आहे. संस्थेने आगामी काळातही सभासदकेंद्री सेवा, आर्थिक शिस्त आणि सहकाराच्या माध्यमातून प्रगतीची वाटचाल सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### पिंपळगाव नाकविंदा येथे बैल व ट्रॅक्टर पोळा धुमधडाक्यात साजरा

राजूर (समर्थ गांवकरी)



मातीशी नात जोडून शेतकऱ्यांच्या स्वप्नांना बळ देणारा,ऊन,पाऊस विसरून शेतात राबणारा, ज्यांच्या कष्टामुळे आपल्या घरात अन्न येते. अशा बळीराजाचा सण म्हणजेच बैलपोळा आहे.या निमित्ताने अकोले तालुक्यातील पिंपळगाव नाकविंदा येथे बैल तसेच ट्रॅक्टर पोळा धुमधडाक्यात साजरा करण्यात आला.

मातीला सोनं करणारे हे खरे साथीदार,शेतकऱ्यांच्या घामाची शान, बैलांच्या कष्टाची ओळख म्हणून तर जगतो या भूमिवर आपण खुशाल यामुळेच शेतकऱ्यांची आन,बान आणि शान असणारे बैल तसेच ट्रक्टर यांची गावातून , डिजेच्या तालावर वाजत गाजत, गुलाळ उधाळत भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील लहान थोरांपासून ते आबाल वृद्धांपर्यंत बहुसंख्य नागरीक यामध्ये सहभागी झाले होते. यावेळी गावातील सर्व ग्रामदेवतांना फेरी मारून दर्शन घेण्यात आले. सर्व शेतकऱ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने बैल तसेच ट्रॅक्टर यांची सजावट केली होती.अनेक बैल मालकांनी आपल्या लाडक्या सर्जा व राजाला मारूती मंदिरा पुढे सलामी देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### राज्यातील ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचे अधिकार जिल्हा परिषद सीईओंना

मुंबई/अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे आणि प्रशासकीय अडचणींमुळे निवडणुका घेता आल्या नाहीत, अशा ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे अधिकार राज्य शासनाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

याबाबत ग्रामविकास विभागाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी असाधारण राजपत्राद्वारे अधिसूचना जारी केली आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १५१ नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला आहे.

शासनाच्या या अधिसूचनेनुसार, ज्या ग्रामपंचायतीची मुदत संपली आहे अशा ठिकाणी विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (आरोग्य), विस्तार अधिकारी (शिक्षण), विस्तार अधिकारी (पंचायत) किंवा इतर कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नेमणूक करण्याचे अधिकार सीईओंना असतील.

ही नियुक्ती महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा ग्रामपंचायत स्थापनेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

### किनवट तालुक्यातील चार अंमलदारांची फौजदारपदी निवड

**दिलीप श्रीमनवार, सुरेश घुगे, चंद्रशेखर मुंडे व कैलास राठोड यांचा समावेश**






किनवट (समर्थ गांवकरी)

किनवट तालुक्यातील पोलीस दिलीप सिरमनवार, सुरेश घुगे, चंद्रशेखर मुंडे व कैलास राठोड या सन २०१३ मध्ये पोलीस उपनिरीक्षक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या चार पोलीस अंमलदारांची अखेर पोलीस उपनिरीक्षक (फौजदार) पदावर निवड झाली आहे.

मा. न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यांच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला असून, या संदर्भातील प्रपत्र दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी निघाले असुन संबधितांना ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत संपुर्ण माहिती सादर करण्यास सांगण्यात आले आहे. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर काम करण्याची संधी मिळणार आहे. चारही अंमलदारांनी पोलीस दलात सेवा बजावत असताना २०१३ मध्ये पोलीस उपनिरीक्षक अर्हता परीक्षा उत्तीर्ण केली होती. मात्र, पदोन्नतीची प्रक्रिया प्रलंबित राहिल्याने त्यांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागली. अखेर न्यायालयीन निर्णयानंतर त्यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे. किनवट तालुक्यातील चार अंमलदारांची फौजदारपदी निवड झाल्याने किनवट तालुक्यात संबधितांमध्ये आनंदाचे वातावरण असून, सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# संत रामपाल जी महाराज यांचा अवतरण दिवस उत्साहात साजरा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

संत रामपाल जी महाराज यांनी नेहमीच सेवा कार्याला महत्त्व दिले आहे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे.सध्या रक्ताचा तुटवडा सर्वत्र मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. रक्तदान शिबिरे होत नसल्याने महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रक्ताचा तुटवडा जाणवत असतो. या कालावधीत सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या भक्तांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

संत रामपालजी महाराज सतलोक आश्रम ढवळपुरी अहिल्यानगर महाराष्ट्र सेवा कमिटीचे वतीने रक्तदान शिबिराचे कार्य कौतुकास्पद आहे. संत रामपाल महाराजांच्या भाविकांनी सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती,एकता व सेवेचा संदेश दिला आहे. असे प्रतिपादन जनकल्याण रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर यांनी केले आहे.

सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल महाराज यांच्या उपस्थितीत कबीर साहेब प्रकट दिवस निमित्त जनकल्याण रक्तकेंद्र व अर्पण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिरात २१६ यूनिट रक्तदान भाविकांनी केले. व २५० भाविकांनी देहदान फॉर्म वर स्वीकृति दिली.तसेच पाच जोडप्यांचे हुंडामुक्त विवाह लावण्यात

**▸२१६ भाविकांचे रक्तदान व २५० भाविकांचा देहदान संकल्प**

**▸सामाजिक व धार्मिक कार्यातून शांती, एकता व सेवेचा संदेश**

आले,ज्याने समाजातील चुकीच्या प्रथा नष्ट करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचले गेले.यावेळी महाराष्ट्र,कर्नाटक,आंध्र प्रदेश, येथून आलेल्या लाखो भक्तांनी भंडाऱ्याचा आनंद लुटला.

मुनिंदर धर्मार्थ ट्रस्टने संत रामपाल जी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली सतलोक आश्रम, ढवळपुरी, पारनेर, अहिल्यानगर (महाराष्ट्र) येथे लाखों श्रद्धाळू च्या उपस्थितीत संत रामपाल जी महाराज




यांच्या अवतरण दिवस निमित्त रक्तदान केले आहे.या कार्यक्रमाद्वारे शांती,एकता व सेवेचा संदेश दिला.

सतलोक आश्रम ढवळपुरी महाराष्ट्र सेवादार कमिटीचे या रक्तदानाच्या महान कार्याचा गौरव प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.व आभार व्यक्त करण्यात आला.

# बुद्धिबळामुळे बुद्धीच्या कौशल्याचा कस लागतो : बाबासाहेब भोस

**श्रीगोंद्यात आंतरराष्ट्रीय नियमानुसार तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात**

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

बुद्धिबळ हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना देणारा खेळ आहे. बुद्धिबळामुळे मानवाच्या बुद्धी कौशल्याचा कस लागतो. तसेच कठीण प्रसंगात जीवनामध्ये योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढीस लागते, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबासाहेब भोस यांनी केले.

अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय, श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती आणि महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथे तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय नियमानुसार झालेल्या या स्पर्धेत विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे व प्राचार्य दिलीप भुजबळ यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास पत्रकार पीटर रणसिंग, उपप्राचार्य नितीन थोरात, श्रीकांत थोरात, क्रीडा संचालिका कल्पना बागुल, डॉ. सुदाम भुजबळ, प्राचार्य शहाजी मखरे, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, क्रीडा शिक्षक संदीप घावटे, संदीप बिरंगळ, दत्तात्रय शेलार, अक्षय लाकूडझोडे, योगेश गोरखे, अशोक कांडेकर, कोकणी सर , शिवाजीराव



**बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन अनोख्या पद्धतीने करण्यात आले. बुद्धिबळाच्या पटाची मांडणी करून मान्यवरांनी वजीराची चाल देऊन उद्घाटन करण्यात आले...**

नागवडे आदी उपस्थित होते.

पंच म्हणून दिपक सुपेकर, विठ्ठल होले, अविनाश मोरे यांनी जबाबदारी पार पाडली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार यांनी केले.

# राज्य कबड्डी संघासाठी ज्येष्ठ पंच म्हणून बाळासाहेब कडूस यांची एकमताने निवड; माजी विद्यार्थ्यांकडून गौरव

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनतर्फे राज्य कबड्डी संघासाठी ज्येष्ठ पंच म्हणून श्री. बाळासाहेब कडूस यांची एकमताने निवड झाल्याबद्दल न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या १९८२ च्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला. हॉटेल सायंतारा येथे आनंदी वातावरणात पार पडलेल्या या स्नेहमेळाव्यात वर्गमित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा देत कडूस सरांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव केला.

राज्यस्तरीय कबड्डी क्षेत्रात ज्येष्ठ पंच म्हणून झालेली ही निवड श्रीगोंद्यासाठी तसेच माजी विद्यार्थ्यांसाठी अभिमानाची बाब असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. ॲड. पांडुरंग खेतमाळीस यांच्या हस्ते बाळासाहेब कडूस यांना




पुष्पगुच्छ, शाल आणि श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना कडूस सर यांनी या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत उपस्थित सर्व वर्गमित्रांचे आभार मानले. कबड्डी क्षेत्रातील कार्य अधिक जबाबदारीने सुरू ठेवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे आयोजन आणि सूत्रसंचालन यशवंत जगदाळे यांनी केले. त्यांच्या नियोजनामुळे मेळावा संस्मरणीय ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी भाऊसाहेब सोनवणे यांनी मनोगत व्यक्त करत कडूस सरांच्या यशाचे कौतुक केले आणि वर्गमित्रांमधील स्नेह कायम जपण्याचे आवाहन केले. या प्रसंगी यशवंत जगदाळे, ॲड. पांडुरंग खेतमाळीस, बाळासाहेब कडूस, भाऊसाहेब सोनवणे, जठार, मोहिते, शिंदे, फंड गोंधळी, दरेकर, शेळके, उगले, अकाराम लोंढे, दातिर, भुसारी, शेलार आदी उपस्थित होते.

# आजचा पाहुणा उपक्रमातून विद्यार्थ्यांनी जाणून घेतले पोलिस दलाचे कार्य



नेवासा (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत इयत्ता चौथीपर्यंत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेवासा खुर्द मुले येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या आजचा पाहुणा या उपक्रमांतर्गत पोलीस कॉन्स्टेबल समीर शेख यांची विशेष मुलाखत घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी बाल पत्रकाराची भूमिका बजावत पोलिस दलाच्या कार्याविषयी विविध प्रश्न विचारून सविस्तर माहिती जाणून घेतली.

शाळेच्या परिपाठात विद्यार्थ्यांना 'मी कोण होणार?' हा प्रश्न विचारल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी संरक्षण क्षेत्रात जाण्याची इच्छा व्यक्त केली. विद्यार्थ्यांचा हा कल लक्षात घेऊन पोलिस दलाची कार्यपद्धती, जबाबदाऱ्या, आव्हाने तसेच पोलिस सेवेत जाण्यासाठी आवश्यक गुण याबाबत विद्यार्थ्यांना माहिती मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. मुख्याध्यापक आसिफ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली व सुनिता कर्जुले यांच्या संकल्पनेतून पोलीस कॉन्स्टेबल समीर शेख यांना 'आजचा पाहुणा' म्हणून आमंत्रित करण्यात आले होते

# एमपीएससी परीक्षेत उत्तुंग यशाबद्दल ऋतुजा कुरुमकर हिचा मुंढेकरवाडीत नागरी सन्मान

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील मुंडेकरवाडी येथील माजी उपसरपंच बापूराव दशरथ कुरुमकर यांची कन्या ऋतुजा कुरुमकर हिने एमपीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत सरळ सेवा भरती परीक्षेतून तिची नुकतीच ग्रामसेवकपदी निवड झाल्याने तिचा लिंपणगाव, मुंढेकरवाडी, शेंडेवाडी या गावच्या वतीने नागरी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी चेअरमन बापूराव कुरुमकर हे होते. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ऋतुजा कुरुमकर हिने सोनई येथील मुळा एज्युकेशन संस्थेच्या कृषी महाविद्यालयात बीएससी ॲग्री शिक्षण घेतले. त्यानंतर लातूर येथील कृषी महाविद्यालयात एमपी एससी ॲग्रीचे शिक्षण घेतले. शिक्षण घेत असताना वेळोवेळी स्पर्धा परीक्षा देत टीसीएस मार्फत तिची सरळ सेवा भरती परीक्षेतून अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कोहने गावात ग्रामसेवक पदी तिची निवड झाली आहे. गाव परिसरात या शेतकऱ्याच्या मुलीने जिद्दीच्या जोरावर व आई-वडिलांच्या पाठबळावर अभ्यासात एकाग्रता ठेवून हे भरीव यश संपादन केल्याने ग्रामस्थांनी तिचे भरभरून कौतुक केले. त्यानिमित्त तिचा गावच्या वतीने नागरी सन्मान करून ऋतुजाला पुढील कार्यास शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. या नागरी सत्कार समारंभात तिच्या आई-वडिलांचा देखील सन्मान करण्यात आला.

यावेळी गावचे ज्येष्ठ नेते बापूराव लक्ष्मण कुरुमकर, माजी सरपंच अरविंद कुरुमकर, मेजर प्रकाश चव्हाण, सुदाम पवार, चंद्रकांत कुरुमकर, संजीवन मुंढेकर, नवनाथ रंधवे, रामदास ठोमस्कर, दादा कुरुमकर, ह भ



प प्रकाश महाराज कुरुमकर ह भ प सर्जेराव महाराज काळे, जयसिंग शेंडे, आप्पा कुरुमकर आदींची शुभेच्छापर भाषणे झाली.

यावेळी सत्काराला उत्तर देताना ऋतुजा कुरुमकर म्हणाली की, माझे प्राथमिक शिक्षण मुंढेकरवाडी गावात झाले, पुढे महाविद्यालयीन शिक्षण श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव शिंदे या महाविद्यालयात पार पडले. पुढे मी उच्च पदावर जाण्याची जिद्द बाळगली. आई-वडिलांचे शिक्षणासाठी भरीव असे पाठबळ मिळाले. स्पर्धा परीक्षा व एमपीएससीचा अभ्यासात सातत्याने लक्ष दिले. म्हणूनच मला हे यश मिळाले. मन लावून स्पर्धा परीक्षा व अभ्यास केला तर निश्चितपणे यश मिळते हा माझा अनुभव आहे. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांनी देखील आपले पुढील भविष्य उज्वल करायचे असेल तर स्पर्धा परीक्षा व एमपीएससी सारख्या परीक्षेतून ध्येय निश्चित घाटता येते. असे सांगून ऋतुजा कुरुमकर पुढे म्हणाली की, मी एवढ्यावरच थांबणार नाही, तर पुढे देखील नोकरी करत असताना स्पर्धा परीक्षा देत गावाला लाल दिवा मिळवण्यासाठी जिद्द कायम ठेवणार असल्याचे सांगितले.

# शिवसेना जिल्हाप्रमुख म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल रामदास गोल्हार यांचे शिवसैनिकांकडून उत्स्फूर्त स्वागत

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील शिवसेना नेते रामदास गोल्हार भाऊ यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या अहिल्यानगर जिल्हा प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या निवडीचे शिवसैनिकांकडून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले तर जुन्या जेष्ठ शिवसैनिकांनी त्यांच्यावर निवासस्थानी जाऊन सत्काराद्वारे शुभेच्छांचा वर्षाव केला.

शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख पदावर कार्यरत असलेले शिवसेनेचे जेष्ठ नेते यांची अहिल्यानगर जिल्हा प्रमुख म्हणून निवड ही शिवसेना वरिष्ठ नेत्यांनी मुंबई येथून केली.सदरची निवड ही शिवसेनेचे मुख पत्र असलेल्या सामनातून जाहीर करण्यात आली.त्यांच्या निवडीचे तालुक्यात फटाक्यांची आतषबाजीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी नेवासा तालुका शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने जिल्हा प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल शिवसेना नेते रामदास गोल्हार यांचा कुकाणा येथे जाऊन सत्कार करण्यात आला.यावेळी शिवसेना प्रणित शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार, तालुका प्रमुख मच्छिंद्र म्हस्के पाटील,माजी उपसरपंच गोरखभाऊ घुले,तालुका उपप्रमुख मुन्ना चक्रनारायण,युवा नेते नारायणभाऊ लष्करे,उपसरपंच अशोक उपळकर, शिवसैनिक राजेंद्र राऊत यांच्या वतीने त्यांचा शाल बुके देऊन सन्मान करण्यात आला.

रामदास गोल्हार भाऊ हे निष्ठावंत शिवसैनिक असून

शिवसेनेत अनेक बदल झाले मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे हीच मुळची शिवसेना असल्याने त्यांनी एकनिष्ठ राहून शिवसेनेशी आपले नाते कधी ही सोडले नाही,प्रत्येक शिवसैनिकांच्या पाठीवर थाप देऊन त्यांना नवी ऊर्जा प्राप्त करून देण्याचे काम गोल्हार भाऊंनी केले असल्याने

त्यांच्या जिल्हाप्रमुख पदाच्या निवडीने शिवसैनिकात मोठा उत्साह असून शिवसेना आता जोमाने जिल्हयात उभी राहील असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सत्कार प्रसंगी बोलतांना व्यक्त केले.

यावेळी बोलताना जिल्हा प्रमुख रामदास गोल्हार म्हणाले की जीवनात आपण कधी ही तत्वांशी तडजोड केली नाही आणि करणार ही नाही,शिवसेनेशी एकनिष्ठ होतो व शेवटच्या श्वासापर्यंत एकनिष्ठच राहून जुन्या नव्या शिवसैनिकांना एकत्रित करून अहिल्यानगर जिल्हा हा



शिवसेनामय करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी बोलताना केला.जिल्हयातील प्रत्येक गावात उबाठा शिवसेनेची स्थापना केली जाईल,शिवसैनिकांना प्रोत्साहन आणि बळ देण्याचा मी प्रयत्न करेन सर्व शिवसैनिकांनी यासाठी मला साथ द्यावी असे आवाहन यावेळी बोलताना केले.

यावेळी झालेल्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी हिंदू हदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.यावेळी झालेल्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक शकुर शेख,कौठा येथील छत्रपती संभाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक उद्धव सोनवणे,नितीन मानूरकर,संदीप धनवटे,सुनिल चोरबेले, विजय वाघुले यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### डिंभे-माणिकडोह बोगद्याला स्थगिती; अंतिम निर्णयासाठी लवकरच बैठक

**माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील**



मंचर (समर्थ गांवकरी)

डिंभे-माणिकडोह बोगद्यामुळे आंबेगाव, जुन्नर व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाण्यावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने या प्रकल्पाला स्थगिती देण्यात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत चर्चा झाली असून, लवकरच बैठक घेऊन बोगद्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी गुरुवार दि.१० रोजी दिली. डिंभे-माणिकडोह बोगदा स्थगिती संदर्भात मंचर येथे आयोजित पत्रकार परिषदेत माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील बोलत होते.यावेळी माजी आमदार पोपटराव गावडे,पंचायत समितीचे सभापती कैलासबुवा काळे,जिल्हा परिषदेचे सदस्य विष्णुकाका हिंगे,बाजार समितीचे सभापती निलेश थोरात,उपसभापती सचिन पानसरे,खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष नवनाथ हुले, आदिवासी नेते सुभाषराव मोरमारे,तालुका महिला राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुषमाताई शिंदे,अक्षदा शिंदे,मंचर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव थोरात इत्यादी मान्यवर उपस्थित होते.माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले कुकडी प्रकल्पाच्या सुधारित आराखड्यात डिंभे-माणिकडोह बोगद्याचा समावेश करण्यात आला आहे. मात्र,या आराखड्यातून निर्माण झालेल्या नवीन प्रश्नांचा पुन्हा विचार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

### शेठ एन. के. टी. महाविद्यालयात रक्तदान व नेत्रचिकित्सा शिबिर

**१०१ रक्ताच्या बाटल्यांचे संकलन!**



ठाणे (समर्थ गांवकरी)

शेठ एन. के. टी. महाविद्यालय, ठाणे येथे संस्थेचे अध्यक्ष शेठ नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन शेठ नानजीभाई खीमजीभाई ठक्कर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास सोसायटीचे मानद मंत्री श्री. नटवरलाल वीरजीभाई ठक्कर, प्रा. डॉ. हिमांशी मनसुखानी, वैभव गलादेकर, रोनक पंचाल, अनघा राजवाडे, वेदांत धोंने, डॉ. दिपाली मुलमुले आणि जितेश पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. दिलीप पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अर्पण ब्लड बँकेच्या सहकार्याने रक्तदान शिबिर, तर लायन्स क्लब ऑफ ठाणे यांच्या डॉक्टर व स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रचिकित्सा शिबिर घेण्यात आले. यावेळी बोलताना शेठ नानजीभाई ठक्कर यांनी रक्तदान हे महादान आहे. आपल्या रक्तदानामुळे एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचविण्यात आपण सहभागी होऊ शकतो, असे सांगितले.

### अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची विचारपूस;

**तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची बॉम्बे हॉस्पिटलमध्ये भेट**



सोनई (समर्थ गांवकरी)

ज्येष्ठ समाजसेवक तथा पद्मभूषण अण्णा हजारे यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांच्यावर मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर गणेशवाडी येथील रहिवासी व सध्या मुंबईत अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन, पश्चिम उपनगरे, वांद्रे) म्हणून कार्यरत असलेले गणेश मिसाळ, अपर जिल्हाधिकारी तथा सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबईचे दत्तात्रय नवले आणि महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्तीय विकास महामंडळाचे अपर जिल्हाधिकारीतथाव्यवस्थापकीय संचालक प्रकाश थविल यांनी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये जाऊन अण्णा हजारे यांची भेट घेतली.यावेळी तिन्ही अधिकाऱ्यांनी अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. अण्णांशी झालेल्या चर्चेदरम्यान विविध विषयांवर संवाद साधत जुन्या आठवणींनाही उजाळा मिळाला. गणेश मिसाळ व दत्तात्रय नवले हे नगर जिल्ह्यातील असल्याने अण्णांशी संवाद साधताना नगर जिल्ह्याशी संबंधित अनेक आठवणी आणि विषय चर्चेत आले.गावाकडच्या नात्याचा जिव्हाळाअण्णा हजारे यांचे सामाजिक कार्य आणि भ्रष्टाचारविरोधी लढ्यामुळे महाराष्ट्रासह देशभरात त्यांना विशेष मानाचे स्थान आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर प्रश्न विचारायलाच हवेत पण ते प्रश्न फक्त शिक्षकांनाच का?

अकोले (समर्थ गांवकरी)

नालासोपारा पश्चिमेतील सोपारा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत खिचडी शिजवताना कुकरचा स्फोट होऊन दोन विद्यार्थी आणि स्वयंपाक करणारी महिला जखमी झाल्याची घटना निश्चितच गंभीर आणि दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्थानिक आमदार स्नेहा दुबे मॅडम यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली. अधिकारी, पालक, माध्यम प्रतिनिधींसमोर तिथल्या शिक्षकांना थेट जाब विचारला. धारेवर धरलं. संबंधित अधिकाऱ्यांना शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्याबाबत निर्देश दिले. पालकत्वाच्या भावनेतून लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी केलेली ही कृती योग्यच आहे.

जखमी विद्यार्थ्यांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळणे आवश्यक होते. त्या परिस्थितीत शिक्षकांकडून काय कार्यवाही झाली की नाही याची चौकशी झालीच पाहिजे. निष्काळजीपणा आढळल्यास जबाबदारी निश्चित केली पाहिजे. पण त्याचवेळी एक मोठा प्रश्न विचारायला पाहिजे तो म्हणजे धोकादायक अवस्थेतील वर्गखोल्यांमध्ये आजही विद्यार्थी बसतात. पडण्याच्या अवस्थेत असलेली स्वच्छतागृहे विद्यार्थी वापरतात. गळक्या किंवा असुरक्षित पाण्याच्या टाक्यांमधून पाणी प्यावे लागते. विविध स्पर्धा, शैक्षणिक उपक्रम आणि कार्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांना कोणत्या खासगी वाहनांतून प्रवास करावा लागतो, या गोष्टींची पुरेशी तपासणी होत नाही. का बरं होत नसेल? या सगळ्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष का केले जाते?

एखादी दुर्घटना घडल्यानंतर शिक्षकांवर बोट ठेवणे सोपे असते. शिक्षक सॉफ्ट टार्गेट असते. पण दुर्घटना घडण्याआधी शाळेची सुरक्षितता तपासणे, धोकादायक बांधकामे दुरुस्त करणे, स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरक्षित करणे, स्वयंपाकघराची पाहणी करणे आणि विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही जबाबदारी नेमकी कोणाची? लोकप्रतिनिधी म्हणून तुमची नाही का? म्हणूनच या घटनेच्या निमित्ताने राज्यातील सर्व आमदार, खासदार आणि मंत्र्यांना एक नम्र आवाहन आहे की...

आपल्या मतदारसंघातील शासकीय शाळांमधल्या

वर्गखोल्या पाहा.

किचन शेड पाहा.

स्वच्छतागृहे पाहा.

पिण्याच्या पाण्याच्या टाक्या पाहा.

विद्युत व्यवस्था पाहा.

शाळेच्या इमारतीची सुरक्षितता पाहा.

आणि विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांसाठी ने-आण करणाऱ्या वाहनांचीही सुरक्षितता तपासा.

एकदा या शाळांचे स्ट्रक्चरल आणि सेफ्टी ऑडिट करून घेतले, तर डोळ्यांत अंजन घालणारे शासकीय शाळांचे विदारक वास्तव लोकप्रतिनिधींच्या डोळ्यासमोर येईल. एखादी दुर्घटना घडल्यानंतर केवळ शिक्षकांवर कारवाईची मागणी करून प्रश्न सुटणार नाही. प्रश्न संपूर्ण व्यवस्थेच्या उत्तरदायित्वाचा आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती योजनेबाबत शिक्षक संघटना अनेक वर्षांपासून स्वतंत्र आणि तटस्थ यंत्रणेमार्फत योजना राबविण्याची मागणी करत आहेत. कारण या योजनेच्या व्यवस्थापनात शिक्षकांचा शिकवण्याचा मौल्यवान वेळ खर्च होतो. धान्य, कडधान्य आणि इतर साहित्याचा पुरवठा तसेच त्यांची गुणवत्ता याबाबतही वेळोवेळी प्रश्न उपस्थित झालेत. त्यावर लोकप्रतिनिधी मौन सोडतील अशी अपेक्षा आहे.

आमच्या परिसरातील अनेक शाळांना अन्न शिजवण्यासाठी भारत गॅस एजन्सीकडून शाळांना सिलेंडर मिळण्यात अडचणी येत आहेत. काही ठिकाणी शिक्षकांना स्वतःच्या घरचा सिलेंडर आणून पोषण आहार शिजवण्याची वेळ आली आहे. हे कोणा लोकप्रतिनिधींना दिसणार नाही! शाळेतील प्रत्येक व्यवस्थेची जबाबदारी सांभाळणारे सर्वे सर्वा शिक्षकांना करून टाकले आहे. त्यात

दुर्दैवाने एखादी घटना घडते, शिक्षक समाज आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहतो आणि शासकीय शाळांचे टीकाकार त्याचे मोठे भांडवल करतात. परिणामी शासकीय शिक्षण व्यवस्थेबद्दल नकारात्मक वातावरण निर्माण होते आणि खाजगीकरणाला आणखी पोषक वातावरण तयार होते.

चूक झाली असेल तर जबाबदारी निश्चित करा; पण व्यवस्थेतील चूक असेल तर व्यवस्थेलाही प्रश्न विचारा.

कारण हा प्रश्न एका शिक्षकाचा नाही. प्रश्न एका शाळेचा नाही.

महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे. आमदार, खासदार आणि मंत्रिमहोदय...

एखादी दुर्घटना घडण्याची वाट पाहण्याऐवजी आपल्या मतदारसंघातील शासकीय शाळांची सुरक्षितता तपासण्यासाठी आणि आपल्या निधीतून भरीव तरतूद करून शाळा भौतिक दृष्ट्या सुंदर बनवण्यासाठी आपण पुढाकार कधी घेणार? शिक्षकांवर कारवाई करण्याइतकीच शाळा सुंदर आणि सुरक्षित करण्याची जबाबदारीही महत्त्वाची नाही का?

## मातीला आकार देत विद्यार्थ्यांनी घडवला पर्यावरणपूरक बाप्पा !

**दुर्गम भागातील सोंगाळवाडी शाळेत विद्यार्थ्यांचा कल्पकतेला आणि कलागुणांना वाव देणारा उपक्रम**

अकोले (समर्थ गांवकरी)

गणेशोत्सवाचे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोंगाळवाडी(पिंपळगाव नाकविंदा) येथे विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून आकर्षक गणेशमूर्ती तसेच बैलपोळ्यासाठी बैलांच्या प्रतिकृती साकारल्या. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्वतः साकारलेल्या गणेश मूर्ती बघून मुलांची मने हरखून गेली...

मूर्ती बनवण्यासाठी सकाळपासून मुलांची मोठी लगबग सुरू होती. विद्यार्थ्यांनी परिसरातून शाडूची व नैसर्गिक माती गोळा करून ती शाळेत आणली. माती मळून तिला आकार देताना विद्यार्थी अक्षरशः रमून गेले होते. आपल्या कल्पकतेचा वापर करत त्यांनी गणेशमूर्ती आणि बैलांच्या प्रतिकृती साकारल्या. स्वतःच्या हाताने बाप्पाची मूर्ती घडवण्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. पुढे या मूर्तींना नैसर्गिक रंगांनी सजवण्यात येणार आहेत. शहरातील किंवा मोठ्या शाळांमध्ये गणेशमूर्ती तयार करणाऱ्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात त्या दृष्टीने विचार केल्यास ही काही नवीन गोष्ट राहिलेली नाही. मात्र दुर्गम भागातल्या एखाद्या आदिवासीबहुल वाडीत प्रथमच हा उपक्रम आयोजित केला आणि त्याचा मुलांना झालेला आनंद शब्दात व्यक्त करता येत नाही असे मुख्याध्यापक बाळू धिंदळे आणि समता कराळे यांनी सांगितले.



प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे. 'मातीपासून मूर्ती, पर्यावरणाची जपणूक आणि विद्यार्थ्यांच्या हातून सर्जनशील निर्मिती' असा या उपक्रमाचा सुंदर संदेश आहे असे शिक्षण विस्तार अधिकारी सविता कचरे यांनी सांगितले.

बदली प्रक्रियेतून नवीन शिक्षक हजर झाले आणि हळूहळू सोंगाळवाडी शाळेचे रूपडं बदलत आहे. शाळेत स्वातंत्र्यदिन सांस्कृतिक कार्यक्रमांसह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानंतर दहीहंडी आणि गोपाळकाल्याचा उत्सवही आनंदात साजरा झाला. आता बैलपोळा आणि गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून कला, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा अनुभव मिळाला आहे.

## एमजेएस महाविद्यालयाचे पाच बुद्धिबळपटू जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धे अंतर्गत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या विविध वयोगटांतील बुद्धिबळ स्पर्धेत एमजेएस महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत पाच जणांनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार बबनराव पाचपुते यांच्या वाढदिवसानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तालुकास्तरीय स्पर्धेच्या प्रारंभी गणेशपूजन करून स्पर्धेला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली.

स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हास्तरीय स्पर्धेत स्थान निश्चित केले. यात भावेश गुगळे याने प्रथम क्रमांक, श्रावणी ताडे, सुमेध घोडके आणि विवेक नाळे यांनी द्वितीय क्रमांक, तर समर्थ घाडगे याने तृतीय क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

## उत्तम सदाकाळ यांच्या बोळातले भूत या बालकथा संग्रहास पुरस्कार

जुन्नर (समर्थ गांवकरी)

शिक्षक संजीवनी या मासिकातर्फे दरवर्षी उत्कृष्ट साहित्य निर्मितीला पुरस्कार दिले जातात. यावर्षी उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार उत्तम सदाकाळ यांच्या बोळातले भूतया बालकथासंग्रहास प्रसिद्ध बाल साहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या हस्ते पुणे येथील पत्रकार भवन येथे प्रदान करण्यात आला. हा बालकथासंग्रह दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित केलेला असून चित्रकार संतोष घोंगडे यांनी हा कथासंग्रह आपल्या जादूई कुंचल्याने नटवला आहे.

यावेळी प्रसिद्ध साहित्यिक दिलीप फलटणकर,स्वाती महाळंक,माधुरी गोखले, भालचंद्र कुलकर्णी,अविनाश सकुंडे,दिलीप गरुड,श्रुती कुलकर्णी,संपादक देविदास लिमजे आणि कार्यकारी संपादक डॉ. संजय जगताप आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.




पुणे येथील शिक्षक संजीवनी मासिकातर्फे मराठी साहित्यातील बालसाहित्य या विभागात दरवर्षी साहित्यिकांच्या साहित्यकृतींना पुरस्कार दिले जातात.यावर्षी बाल साहित्य विभागात मढ,जुन्नर येथील उत्तम सदाकाळ यांच्या बोळातले भूत या बालकथा संग्रहाची निवड करण्यात आली.सन्मानचिन्हप्रशस्तिपत्र शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.उत्तम सदाकाळ यांच्या कथासंग्रहास हा सलग सातवा राज्यस्तरीय पुरस्कार आहे.उत्तम सदाकाळ यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ॲड्. एम. एन. देशमुख महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे थाटात उद्घाटन

राजूर (समर्थ गांवकरी)

ॲड्. एम. एन. देशमुख महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्घाटन नुकतेच उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. किसन पिसाळ यांनी 'साहित्य आणि लोककला' या विषयावर आपले विचार मांडताना अहिल्यानगर जिल्ह्यातील समृद्ध साहित्याचा सविस्तर आढावा घेतला. उत्तम साहित्यनिर्मितीसाठी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण व अखंड वाचन केले पाहिजे, असा मौलिक संदेशही त्यांनी या वेळी दिला. शेवटी त्यांनी शिवरायांच्या जीवनावर पोवाडा सादर केला.




या कार्यक्रमास संस्थेचे संचालक मा. मिलिंद उमराणी, प्रा. लहानू परबत आणि प्रा. दीपक बुऱ्हाडे हे मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख यांनी भूषवले.

याच सोहळ्यात उपस्थितांच्या हस्ते महाविद्यालयाच्या 'रतनगड' या वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन पार पडले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. वाय. देशमुख यांनी मानवी जीवनात साहित्याचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वाङ्मय मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. द. के. गंधारे यांनी प्रास्ताविक करून मंडळाच्या उद्दिष्टांची व उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. भरत शेणकर यांनी करून दिला.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश कुसमुडे यांनी केले, तर डॉ. माया वायळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. या सोहळ्यास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाङ्मय मंडळाचे सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षकांच्या भूमिका

## फुलांची उधळण करत गुरूंप्रती व्यक्त केली कृतज्ञता

पाथर्डी (समर्थ गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री भवानी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळीमानूर येथे शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत एक दिवस विद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज सांभाळले. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती असलेला आदर, प्रेम व कृतज्ञता अनोख्या पद्धतीने व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. देविदास सोनटक्के सर होते. इयत्ता दहावीतील कु. गाडे राजनंदिनी हिने मुख्याध्यापकाची, तर कु. नागरे समृद्धी हिने पर्यवेक्षकाची भूमिका प्रभावीपणे पार पाडली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेतून शाळेतील विविध जबाबदाऱ्यांचा अनुभव घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी विद्यालयातील सर्व शिक्षकांचा पेन व गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. यावेळी शिक्षकांचा सन्मान करताना विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या अंगावर फुलांची उधळण करून आपल्या गुरूंप्रती प्रेम व कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी शिक्षक मनोगत व्यक्त करताना श्री. प्रविण गावडे यांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षक व विद्यार्थ्यांनी काळानुरूप बदलणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच जीवनात वेळेचे नियोजन आणि वेळेचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

श्री. कैलास वाघ यांनी आपल्या मनोगतात जीवनातील गुरुचे स्थान, गुरुजनांचे मार्गदर्शन आणि शिस्तीचे महत्त्व स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य श्री. देविदास सोनटक्के सर यांनी विद्यार्थ्यांना जीवनात गुरुजनांनी सांगितलेल्या चांगल्या गोष्टी कायम ध्यानात ठेवून त्यांचे आचरण करावे, कारण गुरुंचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारे असते, असे त्यांनी सांगितले.



इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक श्री. समीर नरसाळे यांनी शिक्षक दिनाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व विविध जबाबदाऱ्या उत्स्फूर्तपणे पार पाडत शिक्षकांच्या भूमिकेचा अनुभव घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. झेंड अनुष्का हिने, तर आभारप्रदर्शन कु. ढाकणे प्रतीक्षा हिने केले. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त घेतलेला पुढाकार आणि आपल्या शिक्षकांचा केलेला सन्मान हा विद्यालयातील गुरु-शिष्य नात्याची सुंदर अनुभूती देणारा ठरला.